प्रेसनोट दिनांक २९/०३/२०२२

भिवंडी जि.ठाणे येथील 'आयेशा सिद्धीका गर्लस उर्दु प्राथमिक शाळेमधील लिपीक यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| पोलीस ठाणे दैनंदिनी क. | :- | शांती नगर पोलीस ठाणे, भिवंडी, ठाणे शहर पोलीस ठाणे दैनंदिनी क. दि. २९/०३/२०२२ रोजी १९/१५:२१ वा |
| लोकसेविका नाव व कार्यालय | :- | १) श्रीमती तेहसीन मोहिद अहमद मोमीन वय ३६ वर्षे, लिपीक आयेशा सिद्धीका गर्ल्स उर्दु प्राथमिक शाळा, नागाव सलामतपूरा, बैथूसलाम मस्जीद जवळ, भिवंडी, ठाणे<br>२) श्री.अकील मलिक शेख वय ५२ वर्षे वरिष्ठ लिपीक, अन्सारी साफीया गर्ल्स हायस्कुल, भिवंडी, ठाणे |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ९०००/- |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू.९०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार यांचे भावाच्या मुलीस भिवंडी येथील शासकिय अनुदानित 'आयेशा सिद्धीका गर्लस' उर्दु शाळेमध्ये ज्युनियर के.जी. वर्गात प्रवेश देण्याकरीता शाळेतील लिपीक शासकिय फी व्यतिरीक्त रू. ९०००/- देणगीच्या स्वरूपात लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार, तक्रारदार यांनी दि.२८/०३/२०२२ रोजी ॲसीबी, नवी मुंबई कार्यालयात दिली होती.<br>दिनांक २९/०३/२०२२ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान वरिल नमुद लोकसेवक क. १ व २ यांनी, तक्रारदार यांचे भावाची मुलीस ज्युनीयर के.जी. वर्गात प्रवेश देण्याकरीता देणगीच्या स्वरूपात रू. ९०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>दिनांक २९/०३/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडून देणगी स्वरूपात रू.९०००/- लाचेची रक्कम स्विकारताना लोकसेवक क. १ महिला लिपीक श्रीमती तेहसीन मोहिद अहमद मोमीन वय ३६ वर्षे यांना आयेशा सिद्धीका गर्लस उर्दु प्राथमिक शाळा, नागाव सलामतपूरा, बैथूसलाम मस्जीद जवळ, भिवंडी या शाळेतील कार्यालयात दिनांक २९/०३/२०२२ रोजी पंच साक्षीदार यांचे समक्ष १३.०४ वा.रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

मार्गदर्शन अधिकारी :- मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे


संपर्कपत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१

संकेतस्थळ :- **acbmaharashtra@mahapolice.gov.in**

ई-मेल :- **spacbthane@mahapolice.gov.in**

ऑनलाईनतक्रार

ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**

टोलफ्रीनं. :- १०६४

दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉटसॲप क्र. :- ९९३०९९७७००


(ज्योती देशमुख)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

Scanned with CamScanner